☎(020)25813887
ddcahpune@gmail.com
ddcah-mh@gov.in

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जिल्हा पुणे, खडकी, पुणे-०३
District Deputy Commissioner , ( Animal Husbandry & Dairying ) District Pune, Khadaki, Pune - 3

जा.क्र.जिपउआ/जिकृरेके/ तां-३/ 1185 /२०२६ खडकी, पुणे-०३ दिनांक:- /०८/२०२६

# जाहिर लिलाव

निरूपयोगी द्रवनत्र पात्रे खरेदी करणा-या खरेदीदार संस्था/कंपन्या/व्यापारी यांना सूचना देण्यात येते की, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, खडकी, पुणे-३ येथून निरूपयोगी, निर्लेखन केलेली खालील प्रमाणे द्रवनत्र पात्रे विक्री करावयाची आहेत. सदर पात्रे इच्छुकांना अवलोकनासाठी ज्या स्थितीत आहेत त्याच स्थितीत कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | द्रवनत्र पात्रांचा तपशिल | क्षमता लिटर | संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | टी.ए. -५५ द्रवनत्र पात्रे | 55 | 03 | सर्व द्रवनत्र पात्रे निरुपयोगी आहेत. वापरास अयोग्य |
| २ | आय. आर.-३ द्रवनत्र पात्रे | 3 | 12 | |
| ३ | आय.एन.-५० द्रवनत्र पात्रे | 50 | 9 | |
| ४ | बी.ए.-०३ द्रवनत्र पात्रे | 03 | 38 | |
| ५ | जम्बो द्रवनत्र पात्रे | 50 | 1 | |
| | **एकुण** | | **63** | |

त्याकरिता दिनांक ०२/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जिल्हा पुणे, खडकी, पुणे-३ कार्यालय येथे जाहिर लिलाव करण्यात येत आहे. ज्या संस्था/कंपन्या/व्यापारी यांनी निरूपयोगी द्रवनत्र पात्रे खरेदी करावयाची असतील अशा संस्थांनीच भाग घ्यावा. भाग घेण्यासाठी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय खडकी, पुणे रक्कम रू.१४१६/- अक्षरी (रूपये एक हजार चारशे सोळा फक्त) चा राष्ट्रीयकृत बँकेत काढलेला डी.डी. भरणे आवश्यक आहे. जाहीर लिलाव समितीचा निर्णय हा अंतिम राहील. विक्री करण्यात आलेल्या द्रवनत्र पात्रांचे हस्तांतरण करण्यापुर्वी द्रवनत्र पात्रे चेपुन घेण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुध्दा संबधित बोलीधारकाने करणे बंधनकारक राहील. जेणेकरून त्यांचा पुनर्वापर करणे शक्य होणार नाही.

( डॉ. राजेश कुमार वासनिक )
**जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय**
**जिल्हा पुणे, खडकी पुणे ०३**

☎(020)25813887
ddcahpune@gmail.com
ddcah-mh@gov.in

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जिल्हा
पुणे, खडकी, पुणे-०३
District Deputy Commissioner , ( Animal Husbandry
& Dairying ) District Pune, Khadaki, Pune - 3

जा.क्र.जिपउआ/जिकृरेके/ तां-३/ 1186 /२०२६ खडकी, पुणे-०३ दिनांकः-२८/०८/२०२६

**जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, पुणे या कार्यालयातील निर्लेखन झालेल्या निरुपयोगी द्रवनत्र पात्रांचा लिलाव**
**दि.०२/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा.**

## अटी व शर्ती

१. भाग घेणा-यास अनामत रककम रुपये रू.१४१६/- अक्षरी (रूपये एक हजार चारशे सोळा फक्त) मात्र धनाकर्षाच्या (डी.डी.) स्वरुपात लिलावापुर्वी या कार्यालयात भरावी लागेल.

२. लिलावात सहभागी होणा-या बोली धारकाने धनाकर्ष , स्वतः चे आधार कार्ड व इतर अनुषंगीक कागदपत्रे सादर करण्याची वेळ सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत असेल. त्यानंतर सहभागी होणा-या बोलीधारकांचे धनाकर्ष व इतर कागदपत्रे स्विकारले जाणार नाहीत.

३. सदरचे धनाकर्ष अयशस्वी बोलीधारकास लिलाव पुर्ण होताच परत करणेत येतील.

४. यशस्वी बोलीधारकाचा अनामत रकमेचा धनाकर्ष लिलावाची रक्कम पुर्ण भरल्यानंतर परत करणेत येईल किंवा रु. १००००/- वजा जाता उर्वरित मंजुर बोलीची रक्कम त्यास भरावी लागेल.

५. लिलाव तीन वेळा पुकारल्यानंतर अंतिम निर्णय घेणेत येईल. सर्व वस्तुंची मिळुन बोली बोलावी लागेल. विशिष्ट वस्तुसाठी बोली बोलता येणार नाही.

६. लिलावामध्ये ज्या बोली धारकाची बोली सर्वाधिक असेल त्याच्याच नावाने लिलाव तीन वेळा बोली पुकारुन लिलावास अंतिम मंजुरी देणेत येईल.

७. अंतिम लिलाव ज्याच्या नावाने मंजुर होईल त्या व्यक्तिने/संसथेने लिलावाची संपुर्ण रक्कम या कार्यालयाच्या खालील बँक खात्यात आरटीजीएस अथवा धनाकर्षाव्दारे जमा करणे बंधनकारक राहील. पुर्ण रक्कम त्वरीत न भरल्यास त्या व्यक्तिची अनामत रक्कम जप्त करणेत येईल व सदरचा माल नंतरची जास्त बोली असलेल्या व्यक्तिस देण्यात येईल. रक्कम भरावयाच्या बँक खात्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| Bank A/C Name | District Deputy Commissioner of Animal Husbandry Pune 03 |
| Bank A/C No. | 11182905986 |
| IFS Code | SBIN0001629 |
| Bank Name | State Bank Of India, Khadaki Pune District Pune Maharashtra 411003 |

८. अंतिम लिलाव ज्याच्या नावाने मंजुर होईल त्या व्यक्तिने लिलावातील संपुर्ण वस्तुंची वाहतुक स्वतःच्या वाहनाने त्याच दिवशी करावयाची आहे. या कार्यालयाकडुन कोणत्याही प्रकारचे वाहन, हमाल, मदतनीस मिळणार नाही. तसेच द्रवनत्र भांडे चेपुन घेण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुध्दा संबधित बोलीधारकाने करणे बंधनकारक राहील. तसेच लिलाव अंतिम झाल्यापासुन मालाची प्रत्यक्ष वाहतुक करेपर्यंत लिलावाच्या वस्तुचे संरक्षण बोली धारकाने स्वतः करावयाचे आहे. या कालावधीत लिलावातील कोणतीही वस्तु गहाळ झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

९. लिलावामध्ये समाविष्ट असलेल्या वस्तु ज्या स्थितीत आहेत त्या स्थितीत घ्याव्या लागतील. लिलावाच्या वस्तु अगोदरच पाहुन घ्याव्यात नंतर कुठल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

१०. लिलावात सहभागी होणा-याने स्वत:ची ओळख, त्यांचा पत्ता याच्या पुष्ठयर्थ कागदपत्रे सादर करावी लागतील . उदा. पॅन कार्ड , निवडणुक ओळखपत्र , आधार कार्ड इ.

११. लिलावास अंतिम मंजूरी देणे अथवा लिलाव नाकारणे , स्थगित करणे किंवा संपुर्ण लिलाव प्रक्रिया रदद करण्याचा पुर्ण अधिकार लिलाव समितीस असेल व तो बोलीधारकास बंधनकारक असेल.

१२. लिलावाच्या दरम्यान लिलावासंबंधी कोणताही वाद उद्‌भवल्यास या बाबतचा अंतिम निर्णय हा अध्यक्ष लिलाव समिती यांचा असेल व सर्व बोली धारकांना तो बंधनकारक राहील.

१३. वरील सर्व अटी व शर्ती मंजुर असल्याचे हमीपत्र बोलीधारकाने दिल्यानंतरच त्याला लिलाव प्रक्रियेत भाग घेता येईल याची नोंद घ्यावी.

१४. लिलावाचे ठिकाण- जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जिल्हा पुणे कार्यालय, परिसर, खडकी पुणे ०३ ,

अध्यक्ष लिलाव समिती तथा

( डॉ. राजेश कुमार वासनिक )
जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
जिल्हा पुणे, खडकी पुणे ०३

(१)

| | | |
|---|---|---|
| ☎(020)25813887<br>ddcahpune@gmail.com<br>ddcah-mh@gov.in | | महाराष्ट्र शासन<br>पशुसंवर्धन विभाग<br>जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, जिल्हा पुणे, खडकी, पुणे-०३<br>District Deputy Commissioner , ( Animal Husbandry & Dairying ) District Pune, Khadaki, Pune - 3 |
| जा.क्र.जिपउआ/जिकृरेके/ तां-३/ 1184 /२०२६ खडकी, पुणे-०३ दिनांक:27/०८/२०२६ | | |

प्रति,

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला**

विषय : जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र , पुणे या कार्यालयातील निरुपयोगी द्रवनत्र पात्रांची विक्री लिलाव प्रक्रियेव्दारे करणेसाठी जाहिर लिलावाची जाहिरात प्रसिध्द करणे बाबत..

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन या कार्यालया अंतर्गत जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र पुणे या कार्यालयातील निरुपयोगी असलेल्या द्रवनत्र पात्रांचे निर्लेखन करणेत आले असुन त्यांची लिलावाव्दारे विक्री करावयाची आहे. सदर लिलाव प्रक्रिया दि. ०२/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. करावयाची आहे. तरी सोबत जोडलेप्रमाणे लिलावाची सुचना महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, अकोला च्या संकेत स्थळावर दि. १७/०८/२०२६ ते ०१/०९/२०२६ या कालावधीमध्ये प्रसिध्द करावी ही विनंती.

सोबत- प्रसिध्द करावयाच्या लिलाव सुचनेचे प्रारुप

( डॉ. राजेश कुमार वासनिक )
**जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय**
**जिल्हा पुणे, खडकी पुणे ०३**

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१. मा. अतिरिक्त आयुक्त , पशुसंवर्धन , महाराष्ट्र राज्य , पुणे -६७
२. मा. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नाशिक विभाग , पुणे -६७